# जाहिर सुचना (नोटीस)

मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-2017/प्र.क्र.17/का.8/दिनांक 01/09/2017 अन्वये रत्नागिरी जिल्हयातील मुदत संपणाऱ्या 215 ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणूकांचा कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला आहे.

रत्नागिरी जिल्हयातील 215 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक कामी एकूण 665 प्रभागांची 1709 सदस्य पदांसाठी व 215 सरपंच पदासाठी मतपत्रिका छपाई करावयाची आहे.

त्यानुषंगाने निवडणूक मतपत्रिका छपाई करुन पुरवठा करणाऱ्यांना सूचित करण्यात येत आहे की, या कार्यालयाला आवश्यक असणाऱ्या एका पदासाठीच्या 10 बॅलेट मतपत्रिका व 20 प्रदत्त मतपत्रिकेचे दर पत्रक मागविण्यात येत आहे. जे सदरचे मतपत्रिका छपाई करुन पुरवठा करण्यास इच्छा असतील त्यांनी दिनांक 29/09/2017 पर्यंत त्याबाबतचे दर पत्रक सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी येथे समक्ष सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या कार्यालयीन कामकाजाची दिवशी व वेळी लेखी बंद लखोटयात सादर करावे. मुदती नंतर आलेल्या दर पत्रकांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोदं घ्यावी. पुरवठा करावयाच्या मतपत्रिका छपाईच्या संख्येबाबत व तपशिलाबाबत तसेच नमुन्याच्या अधिक माहितीसाठी तसेच अटी व शर्तीबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सर्वसाधारण शाखा येथे संपर्क साधावा.

प्राप्त झालेले पुरवठादार यांचे दरपत्रक दिनांक 03/10/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे दालनात उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

क्रमांक. ससाशा/ग्रापनि/कार्या-1/म.प.छ./2017
जिल्हाधिकारी कार्याल,रत्नागिरी
दिनांक - 21/09/2017

(बाबासाहेब जा. बेलदार)
जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रतिलिपी :-

1. जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी यांचे सूचना फलकावर प्रसिध्दीसाठी
2. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांजकडे

2/- सदरचे जाहिर सूचना(नोटीस) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिध्द करणेत यावी.

जिल्हाधिकारी अधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय.
पत्ता :- सर्वसाधारण शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, 415611
दुरध्वनी क्रमांक :- 02352-222483, ई मे आयडी:- gb_ratnagiri@rediffmail.com

---

रत्नागिरी जिल्हयातील ग्रामपंचायत निवडणूकीकरीता आवश्यक निवडणूक विषयक विविध प्रकारचे फलक, व बिल्ले, साहित्य छपाई करुन पुरवठा करणेकरिता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यताप्राप्त पुरवठा दारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :-**

1. दरपत्रक दाखल करतेवेळी दरपत्रकासोबत इसारा रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार मात्र ) स्टेट बँक ऑफ इंडिया, रत्नागिरी येथील बँकेचा, तहसीलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, यांचे नांवे धनाकर्षाव्दारे (Demand Draft) जोडलेली असावी. इसारा रक्कम भरलेली नसल्यास दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
2. अर्जदार कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंधीत असता कामा नये. तसेच तो राजकीय पक्षाचा सहानुभूतींकर्ता किंवा कोणत्याही राजकीय पुढा-यांचा हितसंबंध, नातेवाईक असता कामा नये. त्याबाबत प्रमाणपत्र/ घोषणापत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.
3. निवडणूक शाखेतील वरीष्ठ अधिका-यांच्या सूचनेनूसार आणि त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा मुख्यालयी तसेच तालुका मुख्यालयी ठिकाणी व कोणत्याही वेळी मागणीनुसार निवडणूक साहित्य व लेखन सामग्रीचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.
4. कैंद्र शासनाच्या वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील तरतुदीनुसार दरपत्रक सादर करताना त्यामध्ये GST नमुद करुन दर पत्रक सादर करावे.
5. पुरवठा दाराने सर्व सामग्री / साहित्य पोहोच करणेची आहे त्यासाठी इतर कोणताही खर्च किंवा आकार देय होणार नाही.
6. पुरवठादारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम (अॅडव्हान्स ) दिला जाणार नाही .
7. सर्व सामग्री / साहित्य उत्तम प्रतीचे /दर्जाचे असणे बंधनकारक राहिल.
8. काम पूर्ण झाल्यानंतर सर्व देयके तीन प्रतीत सादर करणेत यावीत. देयक प्राप्त झालेनंतर अनुदान उपलब्धतेनुसार देयेके अदा करणेची कार्यवाही करणेत येईल.
9. वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास व अधिका-यांनी दिलेल्या लेखन सामग्रीचा पूरवठा वेळेवर न झाल्यास इसारा रक्कम रु. 10,000/- जप्त करुन सरकारजमा करणेत येईल.
10. मंजूर दरपत्रकाचा वैधता कालावधी मंजूरी दिनांकापासून 15 दिवसाचा राहिल.
11. दरपत्रक मंजूर झालेल्या पुरवठादाराने जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रु.२००/-(अक्षरी रु. दोनशे मात्र) इतक्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.
12. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.
13. सदरची दरपत्रक सूचना व त्यातील कोणताही भाग कोणतीही पूर्व सूचना न देता रदद् करणेचा /राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.
14. दरपत्रकातील नमुद साहित्याचा पुरवठा शासनाकडून किंवा मा.राज्य निवडणूक आयोगाकडून झाल्यास सदर साहित्य पुरवठादाराकडून मिळवून घेणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.
15. दरपत्रक मंजूर केल्याच्या दिनांकापासून 7 दिवसात संबंधीत साहित्याचा पुरवठा करणे व पुरवठादारावर बंधनकारक आहे.

साहित्याच्या तपशिलाबाबत / दर्जाबाबत शंका निर्माण झाल्यास किंवा अधिक माहिती आवश्यकता असल्यास छपाईचे नमुने, बिल्ले व लिफाफ्याचा आकार इ. माहितीसाठी तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांचेशी तात्काळ संपर्क साधावा.

जिल्हाधिकारी रत्नागिरी

जिल्हाधिकारी, रत्नागिरी